# गांडूळ खत पिकासाठी लाभदायी

## गोवा कृषी विज्ञान केंद्र, कृषी कार्यालयातर्फे शेतकऱ्यांना खतनिर्मितीवर मार्गदर्शन

**वाळपई , ता. २३ (प्रतिनिधी) :** वाळपई येथे कृषी विभागीय कार्यालयाच्या आवारात 'आयसीएआर' गोवा कृषी विज्ञान केंद्र आणि विभागीय कृषी कार्यालय वाळपई यांच्या संयुक्त विद्यमाने २३ रोजी अनुसूचित जातीतील शेतकरी बांधवांसाठी गांडूळ खत प्रशिक्षण शिबिर कार्यक्रम झाला.

यावेळी एच.आर.सी. प्रभू (कार्यक्रम समन्वयक, यसीआर), तसेच सुरेखा तळावलीकर (होम सायन्स तज्ज्ञ आयसीआर), डॉ. विश्वकर्मा (माती व अन्नद्रव्य तज्ज्ञ आयसीआर), वाळपई विभागीय कृषी अधिकारी विश्वनाथ गावस, साहायक कृषी अधिकारी मयुरेश भट, कृषी साहाय्यक दत्तप्रसाद जोग, ठाणे ग्रामपंचायत पंच नीलेश परवार, खोतोडे पंचसदस्य शारदा हरिजन यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

मान्यवरांनी गांडूळ खत निर्मिती, विविध शेती विषयक व्यवसाय, आधुनिक तंत्रज्ञान यांची सविस्तर माहिती दिली. श्री. प्रभू म्हणाले, गांडूळ खत हे पिकासाठी अतिशय लाभदायी असून जमीन सुसभूषित करण्यात गांडूळांचा मोठा वाटा असतो. म्हणूनच शेतकऱ्यांनी गांडूळ निर्मितीसाठी पुढाकार घेऊन आपल्या बागायतीत, शेतात, परसबागेत गांडूळ खताला प्राधान्य दिले पाहिजे, असे प्रभू म्हणाले. यावेळी शेतकऱ्यांना गांडूळ खत निर्मिती सामग्री, होम सायन्स सामग्री व विविध झाडांची रोपे यावेळी मोफत देण्यात आली. सुमारे ५५ अनुसूचित शेतकरी बंधू भगिनींनी कार्यक्रमाला उपस्थिती लावली व प्रशिक्षण घेतले. कृषी साहाय्यक दत्तप्रसाद जोग यांनी सूत्रसंचालन, तर मयुरेश भट यांनी आभार मानले.



**वाळपई : येथे शिबिरात महिलेला गांडूळ खतनिर्मिती साहित्य देताना श्री. प्रभू. बाजूस मयुरेश भट, विश्वनाथ गावस, निलेश परवार, डॉ. विश्वकर्मा, शारदा हरिजन, सुरेखा तळावलीकर व अन्य मान्यवर.** (पद्माकर केळकर)